# संत तुकारामच्या जीवनकार्यांचा समाज जीवनावर पडलेला प्रभाव.

## (Minor Research Project Sub:- Marathi)

संशोधक :
डॉ. रामचंद्र दत्तात्रय झाडे
सहायक प्राध्यापक मराठी विभाग
शिवाजी महाविद्यालय, कन्नड
जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)
पीन - 431103

## शोधकार्याचा सारांश

वारकरी संप्रदायाचे कळसस्थान असलेले संत तुकाराम यांचे साहित्य हे अनुभवसंपन्न व वस्तुनिष्ठ जीवनाचे दर्शन घडविणारे आहे. त्यांनी समकालीन समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण केले होते. त्यांच्या काळात कर्मठांकडून, सनातन्यांकडून समाजाचे धार्मिक, सामाजिक, शोषण होतच होते. तथाकथित कर्मकांडी पंडित, दांभिक, गोसावी, जादूटोणा, मंत्रतंत्र करणारे मांत्रिक, या सर्वांनी समाजाचे धर्मजीवन व्यापून टाकले होते. पुन्हा एकदा सर्व समाजाला जागे करून परिस्थितीचे यथार्थ ज्ञान व आत्मभान आणून देण्याची गरज निर्माण झाली होती. अशा स्थितीत तुकारामांनी आपल्या साहित्यातून त्या आधारे कथा-कीर्तनातून लोकांशी संवाद साधून समाजाला अंधश्रद्धेपासून, बुवाबाजीपासून दूर करण्याचे कार्य केले.

'संत तुकाराम यांच्या विचारकार्याचा समाजजीवनावरील प्रभाव' या विषयाची पुढील पाच प्रकरणांच्या आधारे शिस्तबद्ध मांडणी केली. पहिल्या प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने तोंडओळख करून देत, विषयाची निवड, विषयाचे महत्त्व, विषयाची व्याप्ती आणि मर्यादा, संशोधन पद्धती इत्यादींचा ऊहापोह केला आहे. दुसऱ्या प्रकरणात संत तुकारामांचे जीवन कशाप्रकारे फुलत गेले, त्यांचा जन्म, त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे घटनाप्रसंग त्याचबरोबर तुकारामांनी विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचाही आढावा घेतला आहे.

तिसऱ्या प्रकरणात संत तुकारामांची लोकाभिमुखता विशद केली आहे. तुकाराम हे खऱ्या अर्थाने लोकसंत म्हणजे जनसामान्यांचे संत होते. समाजाच्या विविध प्रश्न, समस्यांचा त्यांचा जवळून

कशाप्रकारे अभ्यास होता आणि त्याअनुषंगाने त्यांनी आपली नाळ कशाप्रकारे लोकांशी जोडलेली होती, हे प्रस्तुत प्रकरणात विशद करण्यात आले आहे.

चौथ्या प्रकरणात आजची चंगळवादी संस्कृती आणि संत तुकारामांचे विचार  या अनुषंगाने मांडणी केली आहे. तुकाराम आणि आजच्या काळाचे अंतर शेकडो वर्षांचे आहे. मात्र तुकारामांनी त्याकाळी समाजजीवन अशाप्रकारचे असावे, याची आपल्या अभंगांतून जी अपेक्षा व्यक्त केली, ती तंतोतंत आजही प्रत्ययाला येते. आणि त्याची नितांत गरज असल्याचे लक्षात येते.

असावे, याची आपल्या अभंगांतून जी अपेक्षा व्यक्त केली, ती तंतोतंत आजही प्रत्ययाला येते. आणि त्याची नितांत गरज असल्याचे लक्षात येते.

पाचव्या प्रकरणात संत तुकारामांच्या विचारांचे जनमानसातील स्थान शोधण्यासाठी समाजातील विविध नागरिक, कीर्तनकार यांच्याकडून मुक्त प्रश्नावलीअंतर्गत संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण या प्रकरणात करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात संपूर्ण विषयाच्या संबंधाने हाती आलेले आहे. निष्कर्ष मांडले आहेत. ते खालीलप्रमाणे.

संत तुकाराम हे बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. जीवनाच्या विविध अंगांचा साकल्याने विचार करताना त्यांनी त्याबाबत केलेले सूक्ष्म निरीक्षण आणि चिंतन याचा प्रत्यय येतो.

सुमारे साडेतीनशे वर्षानंतरही संत तुकारामांचे अभंग, त्यांचे साहित्य टिकून आहे. विशेषतः ग्रामीण भागात तुकारामांचा अभंग माहीत नाही, असा माणूस सापडणे विरळाच म्हणावे लागेल. त्यांच्या गाथेचे पारायण केले जाते.

संत तुकारामांचे अभंग विचार, सुविचार, म्हणी, वाक्प्रचार या स्वरूपात लोकमानसाच्या ओठांवर रूळलेले आहेत.

आजच्या आधुनिक काळातही आपल्याला 'तुकाराम' हे व्यक्तिनाम समाजातील सर्वच घटकांतील कुटुंबांमध्ये सापडते.

संत तुकारामांच्या नावाने मराठवाडा भागात महाविद्यालये, विद्यालये आहेत. विविध सेवाभावी संस्था आहेत. तसेच तुकारामांच्या नावाने भजनी मंडळे गावोगावी आढळतात. विशेष म्हणजे तुकारामांची मंदिरेही मराठवाड्याच्या परभणी, औरंगाबाद जिल्ह्यात असल्याचे निदर्शनास आले.

ग्रामीण, निमशहरी भागात आजही भजन-कीर्तनाची  परंपरा टिकून आहे. मात्र अलीकडे या परंपरेचा राजकीय हेतूसाठी वापर होत आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, संत तुकारामांचा विचार काळाच्या पुढे जाणारा विचार आहे. संत तुकारामांचा विचार हा प्रगमनशील आहे. त्यांनी सामाजिक सत्य निर्भीडपणे व परखड शैलीत सांगितले. संत तुकारामांचा विचार हा आकाशाएवढा मोठा आहे. कारण ते स्वतःच अत्यंत व्यापक वृत्तीचे होते. त्यांच्या साहित्याने महाराष्ट्रात सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले.

## विषयाचे सामाजिक महत्त्व

समाजातील भोळ्याभाबड्या वारकऱ्यांपासून अभ्यासक, संशोधकांपर्यंत सर्वांनाच तुकारामांच्या वाङ्मयाने मोहित करून टाकलेले आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळातही संत तुकारामांचे अभंग, त्यांचा उपदेश आजच्या समाजमनावर किती प्रभाव टाकतो, याचा अभ्यास होणे गरजेचे असल्याने प्रस्तुत विषयाची निवड केली. याबाबत ज्येष्ठ समीक्षक डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे विवेचन या ठिकाणी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांमध्ये तुकाराम अत्यंत लोकप्रिय आहे. या सर्वांनाच तुकारामाच्या अभंगातील काही म्हणी वा काही ओळी तरी कंठस्थ असतातच. अनेकांना बरेच अभंग पाठ असतात. काही लोकांना तर जवळ जवळ सगळाच तुकाराम कंठस्थ असतो. मराठी लोकांचा महाराष्ट्रातील सर्व संतकवींमध्ये तुकारामावरच सर्वात जास्त लळा आहे. साहित्याच्या भारतीय व परदेशी अभ्यासकांनी तुकारामाचा मराठी भाषिक लोकांवर विलक्षण प्रभाव असल्याचे नमूद केलेले आहे. अगदी आजही आषाढी-कार्तिकीच्या दिंड्यांमधून अगणित ग्रामीण जनता तुकारामाचे अभंग तल्लीन होऊन गात असल्याचे आपण पाहतोच. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातल्या गावागावांमधून निघणाऱ्या या दिंड्या शेवटी श्रीविठ्ठलाचे पवित्र तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे जातात. यावरून हे दिसेल की तुकाराम आणि इतर वारकरी संतांनी बळकट केलेली साहित्य, विनम्रता आणि परमार्थ यांची ही परंपरा आजही ग्रामीण जनमानसात प्रभावी आहे.'

तुकाराम हे संतत्वाचा वारसा सांगणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना वगळून मराठी भाषा व मराठी संस्कृतीचा विचारच करता येत नाही. तुकाराम हे बहुजन समाजातले संत असून, लोकभाषेत लिहिणारे दांभिक, धर्ममार्तंडांशी आणि स्वतःशीसुध्दा संघर्ष करून जीवनातील अनेक संघर्षपूर्ण घटनांना तोंड देत आले आहेत. संत तुकारामाच्या शब्दरचनांना उपदेशाचे आध्यामिक व्यावहारिक असे भिन्न पैलू आहेत.

नेमाडे म्हणतात त्याप्रमाणे, संत तुकारामांचा प्रभाव इतका सर्वव्यापी आहे की, त्याचे मोजमाप वाङ्मयीन वा धार्मिक वा सांस्कृतिक कोणत्याच एका कसोटीत करता येणार नाही.
नीतिमान समाजाच्या उभारणीसाठी आजही त्यांच्या विचारांची असल्याचे प्रस्तुत संशोधनातून सिद्ध झाले आहे.